सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६४ | शनिवार, दि. ७ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. स्वप्नील जोशी**
अमळनेर



**श्री. गौरव कोठावदे**
इंजिनिअर, न्युझीलँड



**श्री. गणेश शिंपी**
सेवेकरी, श्री मंगळग्रह मंदिर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# भूमी सुपोषण चळवळीसाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी

## अमळनेरात काँग्रेसच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांचे आवाहन



अमळनेर : बैठकीस उपस्थित काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, संदीप घोरपडे, मनोज पाटील व पदाधिकारी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार व येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे गुरुवार, दि. १९ मार्च रोजी देश पातळीवरील भूमी सुपोषण चळवळीचा श्री मंगळग्रह मंदिर येथून शुभारंभ होत आहे. या भव्य कार्यक्रमास तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थिती अपेक्षीत आहे. यासाठी कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी झालेल्या काँग्रेसच्या बैठकीत करण्यात आले. यावेळी विविध विषयांवरही खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा झाली.

तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी यांनी चार विषय मांडले होते. यात काँग्रेस भवन ऐतिहासिक वारसा जपण्याचे ठिकाण आहे. काँग्रेस भावना संबंधी चर्चा करण्यात आली. या चर्चेत कृष्णा पाटील, पार्थराज पाटील, रामकृष्ण पाटील, विवेक पाटील, भगवान संदानशिव यांनी सहभाग घेतला. यावेळी काँग्रेस भवनाच्या पडक्या वास्तूचा सर्व मलबा बाहेर काढून साफसफाई करावी. जागेची मोजणी करावी असा ठराव करण्यात आला. यासाठी लोटन चौधरी, शांताराम




पाटील, मनोज पाटील, संदीप घोरपडे, बी. के. सूर्यवंशी, गजेंद्र साळुंखे यांना जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर मंगळ ग्रह सेवा संस्थेच्या पुढाकाराने अमळनेर तालुक्यातील सर्व खेड्यातील शेतकऱ्यांमध्ये भूमी सुपोषणाबाबत जनजागृती करणे, रासायनिक खते, रासायनिक औषध फवारणी यांच्या वापरामुळे, शेतीवर दूरगामी होणारे अनिष्ट परिणाम, त्यामुळे होणारे नुकसान हे अमळनेर तालुक्यातील प्रत्येक पंचायत समिती गणात व जिल्हा परिषद गटात, सभा घेऊन शेतकऱ्यांना उपस्थितीचे आवाहन करण्याचा निर्धार करण्यात आला. त्यानंतर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे उमेदवार निश्चित करण्यासंदर्भात तालुकास्तरीय समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. शांताराम पाटील, संभाजीराव पाटील, अधिकार पाटील, प्रा. शाम पवार, रोहिदास कापडे, मगन वामन पाटील यांची समिती गठीत करण्याचे ठरले. समितीने गट व गणा नुसार बैठका घेऊन, त्यानुसार पंचायत समिती व जिल्हा परिषद उमेदवार निश्चित करावेत असे निश्चित करण्यात आले. डॉ. प्रकाश सोनवणे, अरुण पाटील, हर्षल जाधव, नागराज पाटील, दिलीप पाटील, युवराज पाटील, सुरेश लहू पाटील, सईद तेली, राजू भाट, अनिल पाटील, सुधाकर भैसे, सुभाष शिंदे, पितांबर पाटील, कन्हैयालाल कापडे, भिकाजी पाटील आदी उपस्थित होते.

# अमळनेर मतदारसंघासाठी २५ कोटींचा निधी मंजूर

## आमदार अनिलदादा पाटील : रस्ते विकासाने दळवळण होणार सुकर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : अर्थसंकल्प मार्च २०२६-२७ मध्ये अमळनेर विधानसभा मतदारसंघासाठी सुमारे २५ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. या निधीतून मतदारसंघातील महत्वपूर्ण रस्ते तसेच विविध विकासकामांचा समावेश आहे, अशी माहिती माहिती आमदार अनिलदादा पाटील यांनी दिली आहे. आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रयत्नाने संपूर्ण मतदारसंघात दिवसेंदिवस विकासाचा आलेख वाढत आहे. रस्त्यांसह अनेक विकासकामे पूर्णत्वास आली आहेत. अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. या विकासकामांमुळे मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलत आहे. या अर्थसंकल्पात देखील आमदार अनिलदादा पाटील यांनी २५ कोटींचा भरीव निधी प्राप्त केल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

**अर्थसंकल्प**

**या विकासकामांचा आहे समावेश**

मेहेरगाव- धुळे- अमळनेर- चोपडा- खरगोन रस्ता रा. मा.क्र. १५ कि. मी. ६७/०० ते ६८/५०० व ७१/७५० ते ७२/७४० आणि ७३/५०० ते ७६/२०० ची सुधारणा करणे (भाग रेल्वे उड्डाणपुल ते दहिवद फाटा) एकूण रक्कम ६ कोटी, मुसळीफाटा धरणगाव- अमळनेर- शिंदखेडा रस्ता रामा. क्र. ६ कि.मी. ५१/००० व ५७/२०० ची सुधारणा करणे (भाग- भरवस ते रेल्वे बोगदा) एकूण रक्कम ४ कोटी, रा.मा. ३९ ते जांभोरा- ढेकू- हेडावे- अमळनेर- शिरसाळे- वावडे- मांडळ रस्ता प्रजिमा ५१ कि.मी. २९/६०० ते ३७/५०० ची सुधारणा करणे(भाग- शिरसाळे ते वावडे) एकुण रक्कम २. ५ कोटी, बोळे- मोंढाळे- फाफोरे अमळनेर- मारवड- नीम- कपिलेश्वर रस्ता प्रजिमा ४९ कि.मी. ४९/०० ते ५४/०० ची सुधारणा करणे (भाग कळमसरे ते निम) एकूण रक्कम २. ५ कोटी, चोपडा- चुंचाळे- चौगाव- लासूर- कलाली- निंभोरा- पिंगळवाडे- नंदगाव प्रजिमा-०३ निंभोरा ते पिंगळवाडे गावांदरम्यान चिखली नदीवर पुलाला पोहोच रस्ता करणे कि.मी. ३७/०० जव ४५/५०० (भाग- कलाली ते मुडी प्र.अ.) एकूण रक्कम २.५ कोटी, बोळे- मोंढाळे- फापोरे- अमळनेर- मारवड- नीम कपिलेश्वर रस्ता प्रजिमा ४९ कि.मी. ४०/०० ते ४४/०० ची सुधारणा करणे (भाग धार ते मारवड) एकूण रक्कम २. ५ कोटी, बोळे- मोंढाळे- फापोरे- अमळनेर- मारवड- नीम- कपिलेश्वर रस्ता प्रजिमा ४९ कि.मी. २७/००० ते २९/००० ची मजबुतीकरणासह सुधारणा करणे (रुबजी नगर ते हिंगोणा) १ कोटी, बोळे- मोंढाळे- फापोरे- अमळनेर- मारवड- नीम- कपिलेश्वर रस्ता प्रजिमा ४९ कि.मी. ३३/३०० ते ४०/०० ची सुधारणा करणे (भाग अमळनेर ते धार) एकूण रक्कम २. ५ कोटी, बोळे- मोंढाळे- बहादरपूर- फाफोरे- अमळनेर- मारवड- निम कपिलेश्वर रस्ता प्रजिमा-४९ किमी १५/०० ते १७/८०० मध्ये सुधारणा करणे (ता. पारोळा) एकूण रक्कम १.५ कोटी अशी एकूण रक्कम २५ कोटींची कामे मंजुर झाली आहेत. या निधीबद्दल आमदार अनिलदादा पाटील यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, श्रीमती सुनेत्राताई पवार, ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन व जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचे आभार मानले आहेत.

# अमळनेर- धरणगाव रस्त्यावरील रेल्वे अंडरपास ४५ दिवस बंद!

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील धरणगाव रस्त्यावरील अंडरपास (क्रमांक १३७) दुरुस्तीच्या कामामुळे ४५ दिवस बंद राहणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी पर्यायी रस्त्याचा अवलंब करावा, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. याबाबत संबंधित विभागांना पत्रही देण्यात आले आहे.

या पत्रात म्हटले आहे, की सोमवार, दि. ९ मार्च ते २२ एप्रिल या कालावधीत म्हणजेच ४५ दिवस या अंडरपासमधील वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. या काळात लहान वाहनांसाठी रेल्वे ब्रिज क्रमांक ३२५ खाली पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्यात आली आहे. अवजड वाहनांची वाहतूक ढेकू- सारबेटे या पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. अंडरपासच्या अत्यावश्यक दुरुस्ती आणि सुरक्षिततेच्या कामांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित विभागांना तसेच स्थानिक प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांनी आणि वाहनचालकांनी दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



# टाकरखेडा येथे सोमवारी भव्य रोजगार मेळावा

## माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा सोमवार, दि. ९ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिजाऊ आय. टी. आय., टाकरखेडा येथे होणार आहे. हा मेळावा एसव्हीएस रेफकॉम्प प्रा. लि. या कंपनीतर्फे होणार आहे.

या मेळाव्यात १० वी, १२वी उत्तीर्ण, पदवीधर तसेच आयटीआय (सर्व ट्रेड) उत्तीर्ण उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दहावी, बारावी उत्तीर्ण उमेदवारांना १४ हजार, पदवीधर उमेदवारांना १४ हजार ८०० तर आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांना १८ हजार ४४१ (टेक होम) प्रतिमहिना वेतन दिले जाणार आहे. कामाचे ८ तास राहणार असून ओव्हरटाईम वेगळा दिला जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना कंपनीच्या कायमस्वरूपी पे रोलवर नोकरी, दरवर्षी जानेवारी महिन्यात वेतनवाढ, पीएफ, ईएसआयसी, कॅन्टीन सुविधा तसेच कंपनीच्या नियमानुसार रजा अशा विविध सुविधा देण्यात येणार आहेत. मेळाव्यासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे ठेवण्यात आली असून फ्रेशर तसेच अनुभवी उमेदवार अर्ज करू शकतात. या रोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त युवकांनी सहभागी होऊन रोजगाराची संधी घ्यावी, असे आवाहन शिवसेनेचे जिल्हा संघटक प्रथमेश पवार यांनी केले आहे.

# वीज चोरीप्रकरणी ७० ग्राहकांवर कारवाई

## अमळनेरला महावितरण कंपनीची धडक मोहीम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महावितरणच्या उपविभाग क्र. १ अंतर्गत शहर व परिसरात वीज चोरी रोखण्यासाठी धडक मोहीम राबविण्यात येत आहे. यात सुमारे महिनाभरात ७० ग्राहकांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात आला आहे. घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीज ग्राहकांच्या मीटर तसेच वायरिंगची तपासणी अधिकारी व कर्मचारी करत आहेत.

या कारवाईत घरगुती ६५ व व्यावसायिक ५ ग्राहकांचा समावेश आहे. या ग्राहकांनी एकूण ५७ हजार ७०० युनिट वीज चोरी केल्याचे तपासणीत उघड झाले आहे. गलवाडे रस्त्यावरील काही व्यावसायिक व ग्राहकांचा समावेश आहे. वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध अशीच कारवाई सुरू राहील. नागरिकांनी अधिकृत वीज कनेक्शन घेऊनच वीज वापर करावा, असे आवाहन महावितरण कंपनीने केले आहे. धरणगाव विभागाचे कार्यकारी अभियंता नीलेश सोनगिरे



*अमळनेर : वीज चोरीप्रकरणी कारवाई करताना महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी.*

यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. अमळनेर उपविभाग-१ चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता टी. एच. नेमाडे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून ही वीज चोरी शोध मोहीम राबविली आहे.

# साई रत्न पुरस्काराने चार विद्यार्थिनींचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील साई इंग्लिश अकॅडमीतर्फे विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच प्रतिष्ठेचा साई रत्न पुरस्कार वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. एम. जे. हॉल येथे आयोजित कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी चार विद्यार्थिनींचा पुरस्काराने गौरव करण्यात आला.

संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. भाऊसाहेब देशमुख व प्रतिभा मगर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी मृणाल पाटील, कल्याणी पाटील आणि विष्णू सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. पालकांच्या वतीने शीतल मोरे आणि नितीन भदाणे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक केले.

पान २ वर



*अमळनेर : साई रत्न पुरस्कार स्वीकारताना विद्यार्थिनी.*

## संपादकीय

# तक्रार नव्हे, कृतज्ञता बाळगा!

आयुष्य म्हणजे नेमके काय? हा प्रश्न विचारला की प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार उत्तर देतो. कुणी म्हणते आयुष्य हा संघर्षाचा डोंगर आहे, कुणी म्हणते तो फुलांचा गालिचा आहे, तर कुणी त्याला केवळ एक योगायोग मानते. पण खरे सांगायचे तर आयुष्य हे कोणत्याही एका व्याख्येत अडकणारे गणित नाही. ते एका कोऱ्या कॅनव्हाससारखे आहे. ज्यावर आपण रोज अनुभवांचे रंग ओतत असतो. कधी ते रंग गडद असतात, तर कधी अगदी फिके; पण या सर्वांच्या मिश्रणातून जे चित्र तयार होते, त्यालाच आपण 'जीवन' म्हणतो. आजच्या धावपळीच्या युगात आपण जगणे विसरलो आहोत आणि टिकून राहण्याच्या शर्यतीत सामील झालो आहोत. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण फक्त घड्याळाच्या काट्यावर नाचतोय. पण कधी शांत बसून विचार केलाय का, की या शर्यतीचा शेवट कुठे आहे? आयुष्याचे सौंदर्य त्याच्या क्षणभंगुरतेत दडलेले आहे. एखादे फूल उमलते आणि कोमेजून जाते, पण त्या मधल्या काळात ते आपला सुगंध दरवळवून जाते. आपले आयुष्यही असेच आहे. आपण किती वर्षे जगतो यापेक्षा त्या वर्षांमध्ये किती 'आयुष्य' होते, हे महत्त्वाचे असते. आपण भविष्याच्या चिंतेत आणि भूतकाळाच्या ओझ्याखाली इतके दबलेले असतो, की 'आज' नावाचा हातातला हिरा आपण नकळत गमावून बसतो. सुखाचा शोध आपल्या समाजात यशाचे मोजमाप बँक बॅलन्स, पद आणि प्रतिष्ठेवरून केले जाते. पण खरोखर हेय यश आहे का? एखाद्या अलिशान बंगल्यात एकटे राहण्यापेक्षा छोट्याशा घरात आपल्या माणसांसोबत मनमोकळे हसणे हे जास्त मोलाचे नाही का? आयुष्यात पैसा महत्त्वाचा आहेच, पण तो जगण्याचे साधन असावे, साध्य नाही.

आपण सुखाच्या शोधात वणवण भटकतो, पण सुख हे कस्तुरीसारखे आपल्यापाशीच असते. पावसाच्या पहिल्या सरीचा मृदगंध घेणे, जुन्या मित्राला अचानक भेटणे किंवा कोणाच्या तरी चेहऱ्यावर आपल्यामुळे आलेले हास्य पाहणे यात जे सुख आहे ते कोणत्याही मॉलमध्ये विकत मिळत नाही. अपयश यशाची न दिसणारी पायरी आपण अपयशाला इतके घाबरतो, की नवीन काही करायलाच धजावत नाही. पण आयुष्यात जो पडत नाही, तो धावायला कधीच शिकत नाही. एडिसनने जेव्हा बल्बचा शोध लावला तेव्हा तो हजार वेळा अयशस्वी झाला होता. पण त्याने त्या हजार प्रयत्नांना अपयश न मानता बल्ब कसा बनवता येत नाही, याचे हजार मार्ग' मानले. आयुष्य आपल्याला अनेकदा खाली पाडते. कधी नात्यात दुरावा येईल, कधी नोकरी जाईल, तर कधी आरोग्याच्या तक्रारी उद्‌भवतील. पण या संकटांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. रिस्टार्ट संकटे आपल्याला संपविण्यासाठी येत नाहीत, तर आपल्यातील सुप्त शक्ती जागी करण्यासाठी येतात. आयुष्यातील प्रत्येक 'नाही'मध्ये पुढच्या एका मोठ्या 'हो'ची चाहूल असते. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे, असे आपण म्हणतो. पण आज सोशल मीडियाच्या जगात आपण हजारो लोकांशी जोडलेले असूनही मनातून एकाकी आहोत. आपण 'लाइक्स' आणि 'कमेंट्स'मध्ये आपले अस्तित्व शोधतोय, पण खरे नाते ते असते, जिथे शब्दांची गरज भासत नाही. आयुष्याच्या प्रवासात आपण अनेक प्रवासी भेटतो. काही जण आयुष्यभराची साथ देतात, तर काही जण एक धडा शिकवून निघून जातात.

आपल्या माणसांशी असलेला संवाद संपत चालला आहे. आज एकाच टेबलावर बसलेली चार माणसे आपापल्या मोबाईलमध्ये गुंग असतात. आयुष्यात शेवटी आठवणी राहतात, मोबाईलमधले डेटा नाही. त्यामुळे वेळ काढा, बोला आणि व्यक्त व्हा. कोणावर प्रेम असेल तर ते सांगून टाका, कोणाची माफी मागायची असेल तर अहंकार बाजूला ठेवा. कारण वेळ कोणासाठीच थांबत नाही. आपण संपूर्ण आयुष्य दुसऱ्यांना समजून घेण्यात किंवा दुसऱ्यांसारखे बनण्यात घालवतो. पण स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न खूप कमी लोक करतात. आपल्याला काय आवडते? आपल्या अस्तित्वाचा अर्थ काय? हे प्रश्न स्वतःला विचारणे गरजेचे आहे. आयुष्य हे 'परफेक्ट' नसते आणि ते तसे असण्याची गरजही नाही. तुमच्यातील उणिवांसह स्वतःचा स्वीकार करणे, हाच आनंदी राहण्याचा खरा मंत्र आहे. जपानमध्ये 'इकिगाई' नावाची एक संकल्पना आहे, ज्याचा अर्थ आहे सकाळी उठण्याचे ठोस कारण. तुमच्या आयुष्यात असे काय आहे जे तुम्हाला उत्साहाने उठायला लावते? जर नसेल, तर ते शोधणे हेच खरे आयुष्य आहे. थोडक्यात सांगायचे तर आयुष्य हा एक सुंदर प्रवास आहे, स्पर्धा नाही. येथे कोणाला हरवायचे नाही आणि कोणाकडून जिंकायचेही नाही. आपल्याला फक्त स्वतःचा कालचा रेकॉर्ड मोडीत काढून आज थोडे जास्त चांगले बनायचे आहे. आयुष्यात तक्रारी करण्यापेक्षा 'कृतज्ञता' बाळगायला शिका. जे मिळाले नाही त्याचे दुःख करण्यापेक्षा, जे आपल्याकडे आहे त्याचा आनंद साजरा करा. आयुष्य खूप छोटे आहे, ते तक्रारी करण्यात घालवू नका. भरभरून जगा, मोकळेपणाने हसा आणि आपल्या अस्तित्वाचा ठसा उमटवा. लक्षात ठेवा आयुष्याच्या पुस्तकाचे शेवटचे पान कसे असेल हे आपल्या हातात नसले, तरी आजचे पान कसे लिहायचे हे मात्र नक्कीच आपल्या हातात आहे.

# तुकाराम महाराज बीजनिमित्त अमळनेरला पालखी मिरवणूक

## दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सालाबादाप्रमाणे यावर्षीही कुणबी पाटील समाजातर्फे जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या बीजनिमित्त पालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. दगडी दरवाजा परिसरात राजे संभाजी व शिवशक्ती मित्र परिवारातर्फे पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी व पुष्पवृष्टी करण्यात आली. नागरिकांनी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेतले.

याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, शिवसेनेचे गटनेते पंकज चौधरी, अपक्ष गटनेते महेश देशमुख, नगरसेवक कैलास पाटील, तुळशीराम हटकर, भरत परदेशी, बाळू पाटील, नाविद शेख, प्रताप साळी यांच्यासह तेली पंच मंडळाचे पराग चौधरी, बापू चौधरी तसेच कुणबी पाटील समाजाचे पंच ब्रिजलाल पाटील, किरण पाटील, संतोष पाटील, सुनील अहिरराव, स्वामी चौधरी, कुणाल पाटील, आकाश अहिरराव, नीलेश अहिरराव, भूषण अहिरराव, रोहित अहिरराव, हितेश देसले, समर्थ येवले, राहुल मराठे, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

मान्यवरांनी राजे संभाजी चौक येथे भेट देत पालखीचे दर्शन घेतले व तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. तसेच कुणबी पाटील समाज बांधवांसह नागरिकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राजे संभाजी व शिवशक्ती चौक मित्र परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अमळनेर : पालखी मिरवणुकीप्रसंगी उपस्थित नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेवक महेश देशमुख, पंकज चौधरी आदी.**





*अमळनेर : मुदत संपलेले सभागृह सील करताना पालिकेचे अधिकारी व कर्मचारी.*

# मुदत संपलेले सभागृह पालिकेकडून सील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या मालकीच्या भाडेतत्त्वावर देण्यात आलेले बहुउद्देशीय सभागृह व सामाजिक सभागृह मुदत संपल्याने सील करण्यात आले आहे. ही करवाई बुधवार, दि. ४ मार्च रोजी पालिका प्रशासनाने केली आहे. जप्तीची नोटीस बजावून सील करून ताब्यात घेतल्याची माहिती मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी दिली आहे. पटवारी कॉलनीतील एक सभागृह माजी नगरसेवक संजय मराठे यांच्या संस्थेला देण्यात आले होते, तर माळीवाडा व परिसरातील सामाजिक सभागृह माजी न नगरसेवक विनोद लांबोळे यांना कराराने देण्यात आले होते. सदर इमारती पूर्णपणे पालिकेच्या ताब्यात असून, कोणत्याही व्यक्तीने परवानगीशिवाय प्रवेश करू नये किंवा ताबा मिळविण्याचा प्रयत्न करू नये. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पालिका प्रशासनाने दिला आहे. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाने कर अधिकारी अनिल बोरसे, कर निरीक्षक लौकिक समशेर, राधेश्याम अग्रवाल, विजय बागुल, मनोज सोनार यांच्यासह अतिक्रमण पथक व वसुली विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

# जगातील वेगवेगळ्या जमाती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर आफ्रिकेत बर्बर्स नावाची जमात आढळून येते. अरबांनी आठव्या शतकात आक्रमण करण्याआधी ही जमात या देशात वास्तव्यास आहे. ॲटलास पर्वत, अल्जेरीया, मोरौक्को या ठिकाणी या जमातीचे अस्तित्व आढळून येते. या जमातीचा धर्म मुस्लिम असल्याचे सांगितले जाते. हे लोक बर्बर नावाची भाषा बोलतात. या जमातीचा आणि अरबांचा संघर्ष झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

दक्षिण आफ्रिकेत झुलू नावाची जंगली जमात आढळून येते. दक्षिण आफ्रिकेचा प्रख्यात अष्टपैलू खेळाडू लान्स क्लुस्नर हा या जमातीतीलच होता. दक्षिण आफ्रिकेतील नताल भागात झुलूलैंड नावाचा भाग आहे. तेथे या जमातीचे अस्तित्व आहे.

एकेकाळी ही जमात अत्यंत शक्तीशाली समजली जात होती. १९ व्या शतकाच्या प्रारंभी या जमातीने आपल्या आसपासच्या प्रदेशावर वर्चस्व निर्माण केले होते. दक्षिण आफ्रिका हा ब्रिटिश साम्राज्याचा भाग झाल्यानंतर या जमातीच्या वर्चस्वाला ओहोटी लागली. सध्या या जमातीची लोकसंख्या ५० लाखांपर्यंत असल्याचे सांगितले जाते. पशूपालन आणि शेती हा या जमातीचा मुख्य व्यवसाय आहे.

चीन आणि रशियाच्या सीमेवर मंगोलो वंशाचे लोक आढळून येतात. मंचुरीयातून आलेल्या या लोकांनी १३ व्या शतकात आसपासच्या अनेक प्रदेशावर आक्रमण केले होते. आता हा भाग मंगोलीया म्हणून ओळखला जातो. मंगोलीयातील मोठा भूभाग निबिड जंगलाचा आहे. या भूभागात कमालीची थंडी पडते. आशिया आणि युरोप या खंडांच्या सीमेवरचा हा भाग आहे.

पिम्मी ही जमात गॅबन, कॅमेरून आणि काँगो या देशांच्या जंगलांमध्ये आढळून येते. या जमातीचे लोक हत्तीची शिकार करतात. या जमातीतील लोकांची उंची खूपच कमी म्हणजे पाच फुटांपेक्षाही कमी असते. झाडांच्या फांद्यांपासून बनवलेल्या झोपड्यांमध्ये राहणारे पिम्मी लोक अंगावर लज्जा रक्षणापुरते वस्त्र नेसतात.

# संशयास्पदरित्या पळालेल्या वाहन चालकविरुद्ध गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पोलिसांची नाकाबंदी असताना वाहन न थांबविता पसार झालेल्या संशयित वाहनचालकाविरूद्ध येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवार, दि. ४ मार्च रोजी पहाटे घडली होती.

पोलिसांनी सांगितले, की पैलाड नाक्यावर पोलिस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, होमगार्ड विशाल चौधरी गस्तीवर होते. यावेळी नियंत्रण कक्षाकडून नाकाबंदी करण्याचे आदेश आले होते. पोलिस उज्वलकुमार म्हस्के, अशोक कुमावत, होमगार्ड श्री. पाटील व श्री. मराठे हे देखील नाकाबंदी ठिकाणी हजर झाले होते. यावेळी (एमपी ०४जीबी३७७२) हे पिकअप व्हॅन येत होते. तपासण्यासाठी वाहनचालकास थांबवण्याचा इशारा दिला. मात्र, तो भरधाव धरणगावकडे संशयास्पदरित्या निघून गेला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरीही त्याने वाहन थांबविले नाही. त्यानंतर धरणगाव संशयित वाहनाबाबत माहिती देऊन नाकाबंदी करण्यात आली. तेथूनही तो न थांबता भरधाव जळगावकडे निघून गेला.

# सतत हेडफोन वापरता का? सावधान!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या टेक्नॉसॉव्ही जगात टेक्नॉलॉजीपासून दूर राहणे तसे कठीण. पण त्याचा अतिरेक करणे वाईट. आता कानात हेडफोन घालून ऐकण्याची सवयच पाहा ना. तुम्हालाही कानात हेडफोन घालून सतत गाणी ऐकण्याची, आवाज ऐकण्याची सवय असेल, तर सावधान! तुमच्यासाठी ही माहिती महत्त्वाची आहे.



**कानदुखी :** सातत्याने कानात हेडफोन घालून संगीत ऐकण्याची सवय ही कानदुखीला निमंत्रण देणारी ठरते. त्यामुळे हा त्रास वाढण्यापूर्वी वेळीच काळजी घ्या.

**बहिरेपणा :** आपला कान हा निसगार्ने दिलेली अमूल्य देणगी आहे. ऐकणे हे त्याचे प्रमुख काम आहे. पण किती प्रमाणातील आवाज ऐकायचे हे सुद्धा ठरलेले आहे. आपला कान फार तर ६५ डेसिबलपर्यंतचा आवाज सहन करू शकतात. आपण जर सातत्याने काही तास हेडफोन लाऊन आवाज ऐकत असाल, तर तुमचा बहिरेपणा ठरलेला आहे.

**बुद्धीचे नुकसान :** कितीही झाले तरी हेडफोन हे सुद्धा विद्युत चुंबकीय यंत्रच. सातत्याने हेडफोन वापरल्याने हेडफोनमधील चुंबकीय तरंग आपल्या मेंदूपर्यंत गंभीर लहरी पोहोचवितात.

# साई रत्न पुरस्काराने चार विद्यार्थिनींचा गौरव

**पान १ वरून :** या सोहळ्यात विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या १३३ हून अधिक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यंदाचा प्रतिष्ठेचा व प्रेरणादायी साई रत्न पुरस्कार कल्याणी संदीप पाटील, गार्गी सुनील जोशी, घनिका प्रशांत मालुसरे आणि लिनाली प्रमोद ठाकरे या चार विद्यार्थिनींना प्रदान करण्यात आला. तसेच शाळेत सातत्याने प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या नेहा राकेश पाटील हिला विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. साई इंग्लिश अकॅडमीचे संचालक भैय्यासाहेब मगर यांनी प्रास्ताविक केले. प्रियांका बारी हिने सूत्रसंचालन केले. रीचल पाटील हिने आभार मानले. साई इंग्लिश अकॅडमीच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करून नवे ध्येय गाठण्याची प्रेरणा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


# मी एका रात्रीत २५ लाख कमावतो, रोज १ लाख रुपये खर्च करतो

## बॉलीवूडच्या गायकाची एका परफॉर्मन्सची फी ऐकून व्हाल थक्क!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गायक किती पैसे कमावतात? याबद्दल प्रेक्षकांमध्ये कायम उत्सुकता पाहायला मिळते. बिग बॉस फेम गायक अमाल मलिकने एकदा स्वतःच याबद्दल खुलासा केला होता. अमाल मलिक हा एक लोकप्रिय गायक व यशस्वी संगीतकार आहे. त्याने बॉलीवूडला अनेक गाजलेली गाणी दिली आहेत. अमाल मलिक गाण्यांबरोबरच त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतो. अमाल मलिकने एकदा तो एका रात्रीत किती पैसे कमावतो व किती खर्च करतो, याबद्दल सांगितले होते. त्याने सांगितलेले आकडे ऐकल्यावर अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

अमाल मलिकने सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत त्याच्या आर्थिक व्यवहारांबाबत सांगितले होते. शाळेत असल्यापासून अमाल अकाउंट्समध्ये हुशार होता. त्याच्या पैशांचे व्यवस्थापन तो स्वतः करतो. मात्र, त्याची पैसे खर्च करण्याची पद्धत त्याच्या आईला अजिबात आवडत नाही. " माझ्या आईचे पैशांशी खूप वेगळे नाते आहे. माझे जेवणाचे बिल २० हजार का आहे किंवा मी अचानक एकाच दिवसात एक लाख रुपये का खर्च केले, हे तिला कधीच समजणार नाही. मी पैसे कशावर खर्च करतो त्याबाबत वडिलांना सर्व माहिती देतो. मात्र, आईला सांगताना काळजी घ्यावी लागते. कारण ती माझ्या खर्चामुळे नाराज असते, असे अमाल मलिकने सांगितले.



**मी खूप पैसे खर्च करतो**

पैशांबद्दलची अमालची मानसिकता त्याच्या आईपेक्षा खूप वेगळी आहे. काही खास निमित्त असेल तेव्हा अमला स्वतःला पैसे खर्च करण्यापासून रोखत नाही. कधीकधी एखाद्या इव्हेंटनंतर मी पार्टीला जातो किंवा मी माझ्या टीममधील लोकांना बाहेर घेऊन जातो. त्यावेळी मी खूप पैसे खर्च करतो. त्याबाबतीत मी खूप मोठ्या मनाचा आहे. आपण पैसे साठवून ठेवायला हवे, असे मला वाटत नाही. मला वाटतेय की पैसे कमावले आहेत, तर ते खर्च करायलाच हवे, असे मत अमाल मलिकने व्यक्त केले.

अमालच्या आईचा पैशांबद्दलचा दृष्टिकोन वेगळा आहे. कारण तिने खूप गरिबी अनुभवली आहे. वडिलांचे संगीतकार म्हणून करिअर अपयशी ठरल्यानंतर आईला जे अनुभव आले त्यामुळे तिचा पैशांबद्दलचा दृष्टिकोन असा झाला आहे, असे अमाल मलिकने नमूद केले. अमालचा स्वभाव आईच्या अगदी उलट आहे.

पैशांची पर्वा नसल्याने करिअरमध्ये अनेक मोठे पेमेंट्स सोडून दिले, असे अमालने स्पष्ट सांगितले. बरेच मोठे निर्माते पैसे देण्याचे वचन देतात. मात्र देत नाहीत, असे म्हणत त्याने म्युझिक इंडस्ट्रीची पोलखोल केली. " बरेच असे मोठे निर्माते आहेत जे पेमेंटच्या जवळजवळ ४० टक्के पैसे देत नाहीत. मात्र, ज्या लहान निर्मात्यांकडे बजेट नसते ते मात्र असे करत नाहीत. माझी अशा लहान निर्मात्यांबरोबर काम करण्यास काहीच हरकत नाही. माझे सुमारे २५ लाख रुपये बाकी आहेत. मात्र, मला त्याचा काहीच फरक पडत नाही. कारण देवाची कृपा आहे. मी २५ लाख रुपये एका रात्रीत आणि एका परफॉर्मन्समध्ये कमवू शकतो" असे अमाल मलिक म्हणाला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# हार्ट अटॅकला वेळीच रोखा, फक्त योग्य वेळी करा 'या' तीन टेस्ट...

## तज्ज्ञ सांगतात या टेस्ट करणे का आहे गरजेचे ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हृदयरोगांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. हा सायलेंट किलर आजार हृदयाचे ठोके कधी कमी करतो, हे लोकांना कळतच नाही. गेल्या काही वर्षांत हृदयरोगांचा धोका वाढला आहे. चुकीचा आहार, बिघडलेली जीवनशैली, ताणतणाव, धूम्रपानाची सवय यामुळे कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड वेगाने वाढत आहेत. त्यामुळे हृदयरोग होतात. आजच्या काळात हृदयरोग जगभरात मृत्यूचे सर्वांत मोठे कारण बनले आहे. सर्वांत धोकादायक गोष्ट म्हणजे हा आजार अचानक होऊ शकतो आणि अनेक वेळा त्याची लक्षणे आधीच स्पष्टपणे दिसत नाहीत. म्हणूनच लोकांना नियमित तपासणीद्वारे हे स्पष्ट व्हायला हवे की त्यांचे हृदय निरोगी आहे की नाही.

एम्सचे माजी सल्लागार, सेऊल हार्ट सेंटरचे संस्थापक आणि संचालक तसंच प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. बिमल छाजर यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या माहितीप्रमाणे हृदयाच्या आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी बाजारात असंख्य टेस्ट उपलब्ध आहेत. तसेच कोणत्या चाचण्या सर्वात महत्त्वाच्या आहेत आणि त्या सहजपणे रोग ओळखू शकतात हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. हृदयरोगाची खरी कारणे आणि त्याचे निदान करण्यासाठी कोणत्या चाचण्या आवश्यक आहेत हे तज्ज्ञांकडून जाणून घेऊया.

हृदयरोगाचे मूळ कारण म्हणजे एकच मोठी समस्या म्हणजे रक्तवाहिन्यांमधील अडथळा. हा अडथळा अचानक उद्भवत नाही, तर वर्षानुवर्षे हळूहळू विकसित होतो. मुख्य कारण म्हणजे शरीरात जमा होणारी चरबी. या चरबीला वैद्यकीय भाषेत कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड्स म्हणतात. जेव्हा हे दोन्ही घटक एकत्र होतात तेव्हा हृदयाच्या रक्तवाहिन्या हळूहळू अरुंद होतात. त्यामुळे रक्तप्रवाह मर्यादित होतो. ही चरबी शोधण्यासाठी आपल्या हृदयाबद्दल अचूक माहिती देणाऱ्या विशिष्ट चाचण्या करणे महत्त्वाचे आहे.

### पहिली आणि सर्वांत महत्त्वाची चाचणी लिपिड प्रोफाईल

हृदयाच्या आरोग्य तपासणीतील पहिले आणि सर्वांत महत्त्वाचे पाऊल म्हणजे लिपिड प्रोफाईल चाचणी. ही एक साधी रक्त चाचणी आहे, जी एकूण कोलेस्ट्रॉल, ट्रायग्लिसराइड्स, एलडीएल आणि एचडीएल मोजते. अहवालात सामान्य कोलेस्ट्रॉलची श्रेणी १३० ते २०० दर्शविली असली तरी १५० वरील पातळी हृदयासाठी हानिकारक मानली जाते. जर कोलेस्ट्रॉल १३० च्या आसपास असेल आणि ट्रायग्लिसराइड्स १०० च्या आसपास असतील तर हृदयाच्या ब्लॉकेजचा धोका कमी होतो. तसेच ही पातळी वाढत असताना हार्ट अटॅकचा आणि ब्लॉकेजचा धोकादेखील वाढतो.

### दुसरी चाचणी सीटी कोरोनरी अँजिओग्राफी



आजकाल हृदय तपासणीसाठी सीटी कोरोनरी अँजिओग्राफी ही सर्वात विश्वासार्ह पद्धत मानली जाते. ही चाचणी हृदयाच्या धमन्यांमध्ये ब्लॉकेजची टक्केवारी स्पष्टपणे दर्शवते. ती १० टक्के असो, ४० टक्के असो वा ९० टक्के असो. या चाचणीचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे यामध्ये वायर घालण्याची आवश्यकता नाही आणि रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागत नाही. काही मिनिटांतच संपूर्ण अहवाल उपलब्ध होतो. त्यामुळे जीवनशैलीतील बदल पुरेसे आहेत की उपचार आवश्यक आहेत हे ठरवणे सोपे होते. आपल्या देशभरात शेकडो ठिकाणी सीटी कोरोनरी अँजिओग्राफी उपलब्ध आहे. ही चाचणी आता केवळ मोठ्या शहरांमध्येच नाही तर लहान शहरांमध्येही सहज उपलब्ध आहे.

### तिसरी चाचणी – इकोकार्डियोग्राफी

इकोकार्डियोग्राफी हृदयाच्या संरचनेबद्दल आणि पंपिंगबद्दल अचूक माहिती देते. हृदयाच्या स्नायू योग्यरित्या कार्य करत आहेत की नाही, हृदयाच्या झडपांमध्ये काही दोष आहेत की नाही आणि हृदयाची पंपिंग क्षमता कमकुवत झाली आहे की नाही हे ते ठरवू शकते. कधीकधी अडथळा नसला तरीही हृदय कमकुवत होते. अशा परिस्थितीत ओळखण्यासाठी इकोकार्डियोग्राफी चाचणी खूप उपयुक्त आहे.

### वायर अँजिओग्राफी करताना सावधगिरी का बाळगावी ?

नियमित तपासणीसाठी वायर्ड अँजिओग्राफी आवश्यक नाही. यामध्ये बहुतेकदा तात्काळ अँजिओप्लास्टी किंवा बायपास सर्जरी केली जाते. रूग्णांना फक्त अडथळा आहे का हे जाणून घ्यायचे असते. म्हणून शस्त्रक्रिया पूर्णपणे आवश्यक नसल्यास ही चाचणी टाळणे चांगले. जर तुम्हाला खरोखरच तुमचे हृदय निरोगी आहे की नाही हे जाणून घ्यायचे असेल तर तीन चाचण्या पुरेशा आहेत. वरील तीन चाचण्या हृदयातील चरबीचे प्रमाण, ब्लॉकेज आणि पंपिंगसंबंधित संपूर्ण चित्र स्पष्ट करते. हे केवळ योग्य उपचार निश्चित करण्यास मदत करत नाही, तर अनावश्यक भीती आणि घाईघाईने शस्त्रक्रिया टाळते.

# घरच्यांचा विरोध झुगारून सुरु केला बिझनेस अन् उभारले १५० कोटींचे साम्राज्य...!!

## व्यवसाय करण्यासाठी नोकरी सोडली..!

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



काही यशस्वी व्यक्तींचे आयुष्य अगदी सामान्य असते जिथे त्यांना संसाधने आणि संधींचा अभाव असतो. असे असूनही, ते कठोर परिश्रम करण्यास कधीही मागे हटत नाहीत. मध्य प्रदेशातील भोपाळ येथील अमित निगम यांनी केवळ एक कंपनी स्थापन केली नाही तर असंख्य लोकांना रोजगार दिला आणि बँकिंग क्षेत्राबाहेरील लोकांना विविध सेवा पुरवत आहेत. विशेष व्यवसाय करण्यासाठी नोकरी सोडली. घरच्यांचा विरोध झुगारुन त्यांनी बिझनेस सुरू केला. आता दीडशे कोटींचे साम्राज्य त्यांनी उभे केले आहे.

अमित निगम यांनी २०१७ मध्ये 'बँकइट' नावाचा डिजिटल पेमेंट स्टार्टअप सुरू केला. स्टार्टअपचे ध्येय वंचितांना सेवा देणे आहे. गेल्या पाच वर्षांत, ' बँकइट ' ने महसुलात प्रचंड वाढ पाहिली आहे. कंपनीची उलाढाल सध्या १५० कोटींपर्यंत पोहोचली आहे. अमित निगम यांचा जन्म मध्य प्रदेशातील भोपाळ येथे झाला. त्यांच्या कुटुंबातील बहुतेक सदस्य सरकारी कर्मचारी आहेत. अमित यांचे वडील अलाहाबाद उच्च न्यायालयात वरिष्ठ वकील आहेत. अमित यांनीही सरकारी नोकरी किंवा कायदेशीर व्यवसाय करावा लागेल हे स्पष्ट होते. सरकारी नोकरीत सामील होण्यासाठी नेहमीच त्यांच्यावर दबाव असायचा. मात्र, त्यांना त्यात अजिबात रस नव्हता. अलाहाबाद विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्रात बी.ए. पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी नोएडा येथून मार्केटिंगमध्ये पीजीडीएम केले. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्लेसमेंटद्वारे दिल्लीतील इंडियन रेयॉन लिमिटेडमध्ये त्यांना नोकरी मिळाली. त्यावेळी अमित यांचा पगार दरमहा दहा हजार रुपये होता. अमित व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून सामील झाला. अमितच्या कामगिरीची दखल घेत, कंपनीने सहा महिन्यांत त्याला बढती दिली. अमितने १९९३ ते १९९५ पर्यंत कंपनीत काम केले. त्यानंतर, त्याने एस्कॉर्टेल मोबाइल कम्युनिकेशन्स, उषा आणि एअरटेल सारख्या मोठ्या कंपन्यांमध्ये काम केले. जिथे त्याने विक्री आणि विपणन प्रमुख म्हणून महत्त्वाच्या भूमिका बजावल्या.

### बँकइटची स्थापना कशी झाली ?

२०२७ मध्ये, अमित यांनी बँकइटची स्थापना करण्यासाठी १० लाख गुंतवले. कंपनीचे ध्येय म्हणजे स्थलांतरित कामगार आणि रोजंदारीवर काम करणाऱ्यांना, जे अनेकदा बँकिंग सेवांपासून दूर असतात. त्यांना सुलभ आर्थिक सेवा प्रदान करणे. या व्यक्तींना मोठ्या शहरांमध्ये बँकिंग सेवांमध्ये प्रवेश करण्यात अनेक अडचणी आल्या. कंपनीचा सर्वात मोठा ग्राहक वर्ग स्थलांतरित कामगार आहे. हे डिजिटल प्लॅटफॉर्म लोकांना बँक खाती उघडण्यास, पैसे पाठवण्यास, बिले भरण्यास आणि विमा देखील घेण्यास अनुमती देते. आरडी, एफडी आणि नवीन खाती उघडण्यासारख्या पारंपारिक बँकिंग सेवा देखील उपलब्ध आहेत. बँकइट हे एक सर्व-इन-वन बँकिंग आणि पेमेंट ॲप आहे जे देशभरातील सर्व शहरांमधील लोकांना आर्थिक सेवा प्रदान करते. अमित यांच्या व्यवसाय मॉडेलला खूप यश मिळाले आहे. २०२०-२१ मध्ये कंपनीचा महसूल १५ कोटी होता. २०२३- २४ मध्ये, तो वाढून दीडशे कोटी झाला. बँकइटचे मुख्य कार्यालय नोएडा येथे आहे. ते बँकइट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड म्हणून नोंदणीकृत आहे. अमित यांच्या नेतृत्वाखाली, कंपनी वेगाने वाढत आहे.

## उपयोगी कीटक : चतुर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



चतुर हा कीटक पृथ्वीवरील उष्ण आणि समशीतोष्ण पट्ट्यातील देशात तो आढळतो. चतुर आपल्या दृष्टीने उपयुक्त असा कीटक आहे. अनेक कीटकांसोबतच तो डासांचा फज्जा उडवतो. लांबुळक्या लाल, हिरव्या, निळ्या शरीराच्या चतुराला पंखांच्या दोन जोड्या असतात. शरीराच्या मानाने डोळे मोठे असतात. ते संयुक्त भिंगांचे असतात. प्रत्येक डोळ्यात तीस हजार भिंगे असतात. काही जवळचे पाहणारे तर काही दूरदर्शी. तो फार सफाईदारपणे उडतो. विमानाप्रमाणे पुढे किंवा हेलिकॉप्टरप्रमाणे मागे, बाजूला व स्थिर राहू शकतो. नरापेक्षा मादी आकाराने थोडी लहान असते. मादी जलाशयाला स्पर्श करून अंडी तिथे टाकले व किनाऱ्यालगत टाकते. तेथे अंडी फुटून त्यातून अळी, अर्भक बाहेर येते. ती जागीच स्थिर राहून जवळ आलेल्या पाणकीटकाला ओढून गट्टम करते. ही अवस्था दोन ते तीन वर्षेही टिकते. मात्र अधूनमधून कात टाकून ती मोठी होत असते. सुमारे आठ ते बारा वेळा कात टाकल्यावर पूर्ण वाढ झाली की एका रात्री ती पाण्याबाहेर येऊन वनस्पती वा खटकावर स्थिरावते. तेथे कोशातून चतुर पक्ष्यांची बाहेर येतो. काही काळ ओले शरीर सुकवल्यावर सकाळच्या उन्हात तो हवेत झेप घेतो. आता त्याचा स्वैरसंचार सुरू होतो. त्याचा खालचा ओठ ओढलेला असतो. पण कीटक धरताना तो बाहेर येतो. मात्र चतुरावस्थेत त्याचे आयुष्य दोन ते चार महिन्यांचेच असते. त्याचे प्रमुख शत्रू म्हणजे पक्षी. त्याच्या कचाट्यातून सुटण्याकरिता तो प्रसंगी ताशी १६० कि.मी. इतका वेग गाठू शकतो. जपानमध्ये चतुराला शुभसूचक, सामर्थ्य, धैर्य आणि यशाचे प्रतीक मानतात.

# संवाद हा नात्याचा पाया असतो

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नातेसंबंध म्हणजे दोन व्यक्तींमधील बंधन. हे बंधन प्रेम, आपुलकी, जबाबदारी, अपेक्षा आणि समर्पण यावर उभे असते. पण या सगळ्याच्या मुळाशी जर काही असेल, तर तो म्हणजे संवाद. संवाद हा नात्याचा पाया आहे. संवादाच्या अभावामुळे कित्येक सुंदर नाती विस्कटून जातात, तर संवाद योग्य पद्धतीने झाल्यास कोणत्याही अडचणींवर मात करता येते. कोणत्याही नात्यात विश्वास टिकवण्यासाठी आणि एकमेकांना समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक असतो.

पती व पत्नी ही माणसे प्रामाणिक आणि गंभीरपणे संवाद साधू शकतात, तेव्हा ते एकमेकांचे सर्वोत्तम मानसशास्त्रज्ञ ठरू शकतात. कारण मानसशास्त्र हे मन आणि वर्तन याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. एका व्यक्तीला दुसऱ्याच्या मनातील भावना, विचार, भीती, स्वप्ने आणि असुरक्षितता समजून घेणे गरजेचे असते. हे समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आत्मपरीक्षण आणि संवेदनशीलता लागते. त्यासाठी खुलेपणाने आणि प्रामाणिकपणे संवाद साधण्याची तयारी असावी लागते.

कित्येक वेळा लोक नातेसंबंधांच्या गुंतागुंतीबद्दल तक्रार करतात. 'संबंध फार क्लिष्ट झालेत,' 'तो मला समजून घेत नाही,' 'ती कायम काही ना काही तक्रार करत असते' अशा अनेक तक्रारी ऐकायला मिळतात. पण खरा प्रश्न हा असतो, की आपण एकमेकांशी स्पष्ट आणि मोकळेपणाने बोलतो का ? एका नात्यात संवादाचा अर्थ फक्त बोलणे एवढाच नसतो तर ऐकणे, समजून घेणे, भावनांचा सन्मान करणे आणि उत्तरदायित्व स्वीकारणे देखील तितकेच महत्त्वाचे असते. बऱ्याचदा आपण आपले मुद्दे मांडतो, पण समोरच्या व्यक्तीचे ऐकत नाही. हेच नात्यातील संघर्षाचे मूळ असते.

ज्यावेळेस नात्यांमधे संवाद कमी होतो, त्यावेळी दुरावा निर्माण होतो. समोरच्याला काय वाटते हे विचारण्याऐवजी आपण अंदाज लावतो. 'तो बदलला आहे,' 'ती आत्ता पूर्वीसारखी वागत नाही' अशा निष्कर्षांवर येतो. पण हे खरे आहे का ? हे समजून घेण्यासाठी आपण मोकळेपणाने आणि विनासंकोच संवाद साधतो का ? एकमेकांना वेळ न देणे, संवाद टाळणे, अपुऱ्या माहितीवरून निष्कर्ष काढणे हे सर्व नात्यातील कटूता वाढवते. अनेकदा लोक भांडण करताना आरोप-प्रत्यारोप करतात. पण जर दोघांनी शांतपणे एकमेकांचे म्हणणे ऐकले, तर हा दुरावा मिटू शकतो.

कधी-कधी लोक नात्यातील संवाद टाळतात कारण त्यांना वाटते, की 'जर मी खरे बोललो तर समोरचा दुखावला जाईल' किंवा 'यावर चर्चा केल्याने काही उपयोग नाही' पण हे चुकीचे आहे. नात्यात प्रामाणिकताही असेल, तर आपण आपल्या भावना व्यक्त करायला पाहिजे. आपल्याला काय हवे आहे, हे स्पष्ट सांगितले पाहिजे. 'मला तुझ्याकडून वेळ हवा आहे. माझ्या भावना समजून घेण्याची तुझी इच्छा आहे का ? माझ्यासाठी काय महत्त्वाचे आहे, ते तुला सांगू इच्छितो' आपण समोरच्याकडून काय अपेक्षा करता हे स्पष्ट सांगितले पाहिजे. 'मी तुझ्याकडून अधिक सहकार्याची अपेक्षा करतो. माझ्या निर्णयांचा आदर करावा, अशी माझी इच्छा आहे,' असे स्पष्ट बोलायला हवे.

आपल्या मनातील खऱ्या भावना लपवून न ठेवता बोलले पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीला काही त्रास होत असेल, पण ती ते बोलत नसेल तर समोरचा कसा समजून घेणार ? अजून तरी मनातील ओळखणारे कुठलेही स्कॅनिंग अस्तित्वात आलं नाही. नात्यात अनेक समस्या असू शकतात. विश्वासघात, मतभेद, आर्थिक प्रश्न, मानसिक तणाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या इत्यादी. त्यातून कधीही परिस्थिती चिघळू शकते. भांडणाच्या वेळी किंवा तणावाखाली असताना संवाद करणे टाळले, तर पुढे संवाद टिकून राहतो.

वैयक्तिक आयुष्यात पती-पत्नी दोघेही अनेकदा भांडतात. एक दोनदा पत्नी टोकाचा राग अनुभवतात. पण प्रत्येक वेळेस वाद झाला, भांडणे झाले तरी बोलणे टाकायचे नाही. मांडणाच्या वेळी विषय वेगळे वळण घेऊन कायमचा संवाद संपवू शकतो. त्यामुळे जेव्हा कधी वातावरण निवळेल तेव्हा शांततेत संवाद केल्यास तो अधिक प्रभावी ठरतो. विश्वास हा नात्याचा गाभा आहे आणि विश्वास दृढ करण्यासाठी प्रामाणिक संवाद आवश्यक असतो. जर तुम्ही नेहमी खरे बोलत असाल, समोरच्याची फसवणूक करत नसाल तर तुमच्या नात्यात एक वेगळाच घट्टपणा येतो. विश्वासघात झाल्यास संवाद हा तो दुरुस्त करण्याचा मार्ग असतो. कुणालाही पूर्णपणे समजून घेणे सहज शक्य नसते. पण संवादाच्या माध्यमातून त्या अंतरावर विजय मिळविता येतो. नातेसंबंध टिकवण्यासाठी महागड्या भेटवस्तू, मोठ्या योजना किंवा अविश्रांत प्रयत्न करण्याची गरज नसते. गरज असते ती फक्त प्रामाणिक आणि खुले संभाषण करण्याची. त्यामुळे कितीही वादविवाद झाले तरी संवाद शक्य तितका जोडून ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा संवाद योग्यरित्या होतो, तेव्हा कोणताही वाद मिटू शकतो. नाते टिकू शकते, फुलू शकते आणि अधिक सशक्त बनू शकते. त्यामुळे संवादाला पर्याय नाही. यासाठी बोलत राहा, हसत राहा आणि नाते जपत राहा.

# क्या आपका बच्चा घुलने-मिलने से कतराता हैं ?

## नए दोस्त बनाने में पेरेंट्स ऐसे कर सकते हैं उनकी मदद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बचपन में दोस्ती सिर्फ खेलने तक सीमित नहीं होती, बल्कि यह बच्चे के आत्मविश्वास, व्यवहार और व्यक्तित्व के विकास से भी जुडी होती हैं। कुछ बच्चे नए माहौल में जल्दी घूल-मिल जाते हैं, तो कुछ को लोगों के बीच सहज होने में समय लगता हैं। अगर आपका बच्चा भी नए दोस्तों से बात करने में हिचकिचता है या अकेले रहना पसंद करता है, तो घबराने की जरूरत नहीं है। हर बच्चे का स्वभाव अलग होता है, लेकिन सही मार्गदर्शन और सहयोग से उसकी सोशल स्किल्स को बेहतर बनाया जा सकता है। माता-पिता को छोटी-छोटी कोशिशे बच्चे के आत्मविश्वास को बढाने और उसे नए रिश्ते बनाने के लिए प्रेरित करने में बडी भूमिका निभा सकती है।

हम अक्सर देखते है कि कुछ बच्चे खेल के मैदान में जाते ही सबके साथ घुल-मिल जाते है, जबकि कुछ बच्चे किनारे खडे होकर दूसरो को खेलते हुए देखते रहते है। बचपन के यही अनुभव भविष्य में उनके व्यक्तित्व का निर्माण करते है।

दोस्त बनाना बच्चों की सोशल लाइफ के लिए काफी जरूरी है, लेकिन अगर बच्चा अकेले रहना पसंद करता है या उसे दोस्त बनाने में हिचकिचाहट होती है, तो यह माता-पिता के लिए चिंता का विषय हो सकता है। आइए समझते है कि इसके पीछे के कारण क्या है और ऐसे में पेरेंट्स कैसे अपने बच्चे की मदद कर सकते है।

बच्चे को दोस्त बनाने में मुश्किल क्यों होती है।

- शर्मीला स्वभाव - कुछ बच्चे स्वभाव से ही इंट्रोवर्ट होते है। उन्हे नए लोगों से बात शुरू करने में डर या घबराहट महसूस होती है।

- सोशल एंग्जायटी - कई बार बच्चा इस बात से डरता है कि दूसरे बच्चे उसे पसंद करेंगे या नहीं, या कहीं उसका मजाक तो नहीं उडेगा।

- सोशल स्किल की कमी - कुछ बच्चों को यह समझ नहीं आता कि बातचीत कैसे शुरू करें, अपनी बारी का इंतजार कैसे करें या दूसरों के साथ खिलौने कैसे शेयर करें।

- बदलाव का असर - घर बदलना या नए स्कूल में जाना भी बच्चे को अकेला महसूस करा सकता है, क्योंकि पुराने दोस्त पीछे छूट जाते है।

पेरेंट के रूप में आप कैसे मदद करें ?

- घर पर 'रोल-प्ले' करें- बच्चे अक्सर प्रैक्टिस से सीखते है। घर पर खेल-खेल मे स्थिति बनाएं। आप कहें, मानो मैं एक नया बच्चा हूं, तुम मुझसे दोस्ती कैसे करोगे ?, उन्हे सिखाएं कि हैलो कैसे बोलना है या किसी खेल में शामिल होने के लिए कैसे पूछना है।

- छोटे प्ले-डेट्स का आयोजन करें-एक साथ बहुत सारे बच्चों के बीच जाने से बच्चा घबरा सकता है। इसकी शुरूआत घर पर किसी एक या दो बच्चों को बुलाकर करे। छोटे समूह में बच्चा ज्यादा सुरक्षित और कमफर्टेबल महसूस करता है।

- उनकी हॉबीज को बढावा दें- अगर आपके बच्चे को पेंटिंग, स्केटिंग या म्यूजिक पसंद है, तो उन्हें ऐसी क्लास में भेजे जहां उनकी पसंद के अन्य बच्चे हो। कॉमन इंटरेस्ट दोस्ती को आसान बना देती है।

- उनकी भावनाओं को समझें - कभी भी बच्चे पर दोस्ती का दबाव न डाले। उन्हें यह न कहें कि तुम इतने शांत क्यों हो ? इसके बजाय उनसे बात करें कि उनको नए लोगो से बात करने क्यों डर लग रहा है। उनकी बात सुनें और उन्हें आश्वासन दिलाएं कि आप उनके साथ है।

- अच्छे सोशल बिहेवियर का उदाहरण बनें- बच्चे आपको देखकर सीखते है। जब आप पडोसियो या अजनबियों से तमीज से और मुस्कुराहट के साथ बात करते है, तो बच्चा अनजाने में वही गुण सीखता है। ये गुण उनकी दोस्ती करने में मदद करते है।


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे



# ॥ मंगल ॥ पान

## दु:खाचे कारण अहंकार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आध्यात्मिक दृष्टीने पाहिले, तर दु:खाचे मूळ कारण देह, परिस्थिती किंवा जग नाही; दु:खाचे खरे कारण म्हणजे 'मी' अर्थात अहंकार अहंकार म्हणजे स्वतःला एका मर्यादित व्यक्तीच्या चौकटीत बंद करून घेणे. या चौकटीत माझे, मला, मीच, माझ्यासाठी अशा संकल्पना जन्म घेतात आणि त्यांच्याशी प्रखर आसक्ती निर्माण होते. ज्या क्षणी आपण या संकल्पनांशी घट्ट तादात्म्य करतो, त्या क्षणी दु:खाची बीजेही पेरली जातात. कारण अहंकार जितका घट्ट होत जातो, तितक्या बाह्यविश्वातील, आपल्या आजूबाजूच्या घडामोडी आपल्याला क्षतीग्रस्त करू लागतात. संत सांगतात, दु:खाची उत्पत्ती बाहेर होत नाही, ती एखाद्या बाह्यघटनेची प्रतिक्रिया म्हणून अहंकारातूनच जन्मते. हा 'मी' दु:खी होऊ शकतो, पण खरा 'मी' म्हणजे आपला आत्मा आहे, जो शांत, स्थिर आणि निरभ्र आहे. ज्याने हे आत्मस्वरूप जाणले, तो बाह्यप्रसंगांनी दु:खी होऊ शकत नाही. कोणी तरी आपले कौतुक करावे, आदर द्यावा, आपल्या म्हणण्याप्रमाणेच जगाने वागावे, असे अहंकाराला वाटते. तसे न झाल्यास राग येतो, एखाद्याविषयी मत्सर निर्माण होतो. मात्र, तरी अहंकाराचे समाधान होत नाही. आणखी काहीतरी मिळायला हवे, असे सतत वाटत राहते. ही अखंड धडपडच दु:खाचे मूळ आहे. बाह्य गोष्टींनी आपण हे दु:ख दूर करू शकत नाही. हा मिथ्या 'मी' ओळखणे हा या दु:खावरील उपाय आहे. ज्या क्षणी आपणास जाणीव होते की, विचार, भावना आणि देहाच्या प्रतिक्रिया यांवर 'मी'चा हक्क नाही, तेव्हा दु:खाचे मळभ दूर होऊ लागते. जेव्हा ही जाणीव अंतर्मनात पाझरते तेव्हा आपण प्रत्यक्षात अहंकार नाही; तर साक्षीभाव आहोत, याची जाणीव होते. साक्षीभावात दु:खाची जागा नाही, कारण तो कोणत्याच भावनेशी 'मी' म्हणून जोडला जात नाही. अहंकार कमी झाला की, दु:ख आपोआप विरघळते. जसे नदी समुद्रात विलीन झाली की तिची ओढ संपते, तशीच व्यक्तीची ओळख व्यापक चैतन्यात मिसळली की दु:खाला कारणच उरत नाही. आत्म्याचे स्वरूप ओळखणे हे दु:खापासून मुक्त होण्याचे एकमेव अधिष्ठान आहे, कारण जेव्हा 'मी' विस्तृत होतो, तेव्हा दु:खाचा पाया कोसळतो आणि उरते ती शांत, निर्मल, अपरिवर्तनीय चैतन्यानुभूती.

## पार्वती ही है माता दुर्गा

भाग-२

### देवी मातंगी

दस महाविद्याओं में नौवीं देवी मातंगी हैं। हनुमानजी के गुरु मातंग मुनि थे जो मातंग समाज से संबंध रखते थे। देवी का सम्बन्ध प्रकृति, पशु, पक्षियों, जंगलों, वनों, शिकार इत्यादि से हैं तथा जंगल में वास करने वाले आदिवासियों, जनजातियों कि देवी पूजिता हैं। देवी मातंग मुनि के पुत्री के रूप से भी जानी जाती हैं। एक बार मातंग मुनि ने, सभी जीवों को वश में करने हेतु, नाना प्रकार के वृक्षों से परिपूर्ण वन में देवी श्रीविद्या त्रिपुरा की आराधना की। मातंग मुनि के कठिन साधना से संतुष्ट हो देवी त्रिपुर सुंदरी ने अपने नेत्रों से एक श्याम वर्ण की सुन्दर कन्या का रूप धारण किया।

इन्हें राज मातंगी कहा गया तथा ये भी देवी मातंगी का ही एक स्वरूप हैं। तभी देवी मतंग कन्या के नाम से भी जानी जाती हैं। देवी की उत्पत्ति शिव तथा पार्वती के उच्छिष्ट भोजन से हुई थी। इसीलिए देवी का एक अन्य विख्यात नाम उच्छिष्ट चांडालिनी भी हैं तथा देवी का सम्बन्ध नाना प्रकार के तंत्र क्रियाओं से हैं। शक्ति संगम तंत्र के अनुसार, एक बार भगवान विष्णु और उनकी पत्नी लक्ष्मी जी, भगवान शिव तथा सती से मिलने हेतु कैलाश पर्वत गये, पर जहां शिव तथा सती जी का निवास स्थान है। भगवान विष्णु, अपने साथ खाने की कुछ सामग्री अपने साथ ले गए तथा शिव जी को भेट की। शिव तथा सतीजी ने, उपहार स्वरूप प्राप्त हुए वस्तुओं को खाया, भोजन करते हुए खाने का कुछ भाग नीचे धरती पर गिरा। परिणामस्वरूप, उन गिरे हुए भोजन के भागों से एक श्याम वर्ण वाली दासी ने जन्म लिया, जो मातंगी नाम से विख्यात हुई। देवी की आराधना सर्वप्रथम भगवान विष्णु द्वारा की गई थी, तभी भगवान विष्णु सुखी, सम्पन्न, श्रीयुक्त तथा उच्च पद पर विराजित हैं। देवी की अराधना बौद्ध धर्म में भी की जाती हैं, किन्तु बौद्ध धर्म के प्रारंभ में देवी का कोई अस्तित्व नहीं था। कालांतर में देवी बौद्ध धर्म में मातागिरी नाम से जनि जाने लगी।

नारदपंचरात्र के अनुसार, कैलाशपति भगवान शिव को चांडाल तथा देवी शिवा को ही उछिष्ट चांडालिनी कहा गया हैं। देवी मातंगी चौसठ प्रकार के ललित कलाओं से संबंधित विद्याओं से निपुण हैं तथा तोता पक्षी इनके बहुत निकट हैं।

### देवी कमला

श्रीमद भागवत के आठवें स्कन्द में देवी कमला की उत्पत्ति कथा है। दस महाविद्याओं में अंतिम देवी कमला तांत्रिक लक्ष्मी के नाम से भी जानी जाती हैं। देवी कमला, जगत पालन कर्ता भगवान विष्णु की पत्नी हैं। देवताओं तथा दानवों ने मिलकर, अधिक संपन्न होने हेतु समुद्र का मंथन किया, समुद्र मंथन से 18 रत्न प्राप्त हुए, जिनमें देवी लक्ष्मी भी थी, जिन्हें भगवान विष्णु को प्रदान किया गया तथा उन्होंने देवी का पानिग्रहण किया। देवी का घनिष्ठ संबंध देवराज इन्द्र तथा कुबेर से हैं, इन्द्र देवताओं तथा स्वर्ग के राजा हैं तथा कुबेर देवताओं के खजाने के रक्षक के पद पर आसीन हैं। देवी लक्ष्मी ही इंद्र तथा कुबेर को इस प्रकार का वैभव, राजसी सत्ता प्रदान करती हैं। उल्लेखनीय है कि श्रीविष्णु ने भृगु की पुत्रीं लक्ष्मी से विवाह किया था। दीवावली के दिन देवी काली और कमला की पूजा की जाती है। शैव लोग काली की और वैष्णव लोग कमला की पूजा करते हैं। कमला



को ही महालक्ष्मी कहा गया है। प्रवृति के अनुसार दस महाविद्या के तीन समूह हैं। पहला:- सौम्य कोटि (त्रिपुर सुंदरी, भुवनेश्वरी, मातंगी, कमला), दूसरा:- उग्र कोटि (काली, छिन्नमस्ता, धूमावती, बगलामुखी), तीसरा:- सौम्य-उग्र कोटि (तारा और त्रिपुर भैरवी)।

देवी दुर्गा : सामान्यतः देवी दुर्गा दो रूपों में जानी जाती हैं, एक में वे दस भुजा वाली तथा दूसरे में अष्ट भुजा रूप में हैं। देवी का वाहन सिंह या बाघ हैं तथा असुर या दैत्य का वध कर रही हैं। हिरण्याक्ष के वंश में उत्पन्न एक महा शक्तिशाली दैत्य हुआ, जो रुरु का पुत्र था जिसका नाम दुर्गमासुर था। इसने शक्तिशाली होने तथा देवताओं को पराजित करने के लिए ब्रह्माजी की गठिन तपस्या की फलस्वरूप त्रिलोक में सभी संतप्त होने लगे। उसने समस्त मंत्र और वेदों को भी ब्रह्माजी से मांग लिया। वर प्रदान करने के कारण ऋषियों और देवताओं के समस्त वेद तथा मंत्र लुप्त हो गए तथा स्नान, होम, पूजा, संध्या, जप इत्यादि का लोप हो गया। इस प्रकार जगत में एक अत्यंत ही घोर अनर्थ उत्पन्न हो गया तथा हविभाग न मिले के परिणामस्वरूप देवता जरा ग्रस्त हो, निर्बल हो गए। देवताओं की यह दशा देखकर दुर्गमासुर दैत्य ने इंद्र की अमरावती पुरी को घेर लिया। देवता शक्ति से हीन हो गए थे, फलस्वरूप उन्होंने स्वर्ग से भाग जाना ही श्रेष्ठ समझा। भागकर वे पर्वतों की कंदरा और गुफाओं में जाकर छिप गए और सहायता हेतु आदि शक्ति अम्बिका की आराधना करने लगे। हवन-होम आदि न होने के परिणामस्वरूप, जगत में वर्षा का अभाव हो गया तथा वर्षा के अभाव में भूमि शुष्क तथा जल विहीन हो गया और ऐसे स्थिति सौ वर्षों तक बनी रही। बहुत से जीव जल के बिना मारे गए, घर घर में शव का ढेर लगने लगा। इस प्रकार अनर्थ की स्थिति को देख, जीवित मानुष, देवता इत्यादि हिमालय में जा कर ध्यान, पूजा तथा समाधी के द्वारा आदि शक्ति जगदम्बा की आराधना कर उन्हें प्रसन्न करने का प्रयास करने लगे।

इस प्रकार बारंबार स्तुति करने पर, समस्त भुवन पर शासन करने वाली भुवनेश्वरी, नील कमल के समान अनंत नेत्रों से युक्त स्वरूप में प्रकट हुई। काजल के समान देह, नील कमल के समान विशाल नेत्रों से युक्त देवी अपने हाथों में मुट्ठी भर बाण, विशाल धनुष, कमल पुष्प, पुष्प-पल्लव, जड़ तथा फल, बुढ़ापे को दूर करने वाली शाक आदि धारण की हुई थी। दिव्य तथा प्रकाशमान, अत्यंत नेत्रों के साथ वे जगद्धात्री, भुवनेश्वरी, समस्त लोको में, अपने सहस्त्रों नेत्रों से जलधाराएं गिराने लगी तथा नौ रातों तक घोर वर्षा होती रही। फलस्वरूप समस्त प्राणी तथा वनस्पतियां तृप्त हुई, समस्त नदियां तथा समुद्र जल से भर गई। इस अवतार में देवी शताक्षी नाम से जानी जाने लगी। देवी शताक्षी ने सभी को खाने के लिए शाक तथा फल-मूल प्रदान किए, साथ ही नाना प्रकार के अन्न तथा पशुओं के खाने योग्य पदार्थ भी। उसी काल से उनका एक नाम शाकम्भरी भी हुआ। एक दूत ने दुर्गमासुर यह सभी गाथा बताई और देवताओं की रक्षक के अवतार लेने की बात कहीं। तक्षण ही दुर्गमासुर क्रोधित होकर अपने समस्त अस्त्र-शस्त्र और अपनी सेना को साथ ले युद्ध के लिए चल पड़ा।

दैत्यराज दुर्गमासुर ने देवता और मनुष्यों आदि पर प्रहार किया परिणामस्वरूप देवी ने चारो ओर तेजोमय चक्र बना दिया तथा स्वयं बहार आ खड़ी हुई। दुर्गम दैत्य तथा देवी के मध्य घोर युद्ध छिड़ गया, तदनंतर देवी के शारीर से उनकी उग्र शक्तियां, देवी की सहायता हेतु प्रकट हुई। काली, तारिणी या तारा, बाला, त्रिपुरा, भैरवी, रमा, बगला, मातंगी, कामाक्षी, तुलजादेवी, जम्भिनी, मोहिनी, छिन्नमस्ता, गुह्यकाली, त्रिपुरसुन्दरी तथा स्वयं दस हजार हाथों वाली, प्रथम ये सोलह, तदनंतर बत्तीस, पुनः चौंसठ और फिर अनंत देवियाँ हाथों में अस्त्र शस्त्र धारण किये हुए प्रकट हुई। दस दिन में दैत्यराज की सभी सेनाएं नष्ट हो गई तथा ग्यारहवे दिन देवी तथा दुर्गमासुर में भीषण युद्ध होने लगा। देवी के बाणों के प्रहार से आहात हो, दुर्गमासुर रुधिर का वामन करते हुए, देवी के सन्मुख मृत्यु को प्राप्त हुआ तथा उसके शरीर से तेज निकल कर देवी के शरीर में प्रविष्ट हुआ। इसके पश्चात् ब्रह्मा आदि सभी देवता, भगवान् शिव तथा विष्णु को आगे कर, भक्ति भाव से देवी की स्तुति करने लगे। इस प्रकार ब्रह्मा, विष्णु, शिव, अन्य देवताओ के स्तुति करने तथा विविध द्रव्यों से पूजन करने पर देवी संतुष्ट हो गई तथा दुर्गा नाम से जानी जाने लगी। देवता द्वारा किये हुए स्तवन में, देवी दुर्गा को तीनो लोकों की रक्षा करने वाली, मोक्ष प्रदान करने वाली, उत्पत्ति, स्थिति तथा संहार करने वाली कहा गया हैं। यह यह आदि शक्ति अम्बिका की शक्ति है।

क्रमशः

## श्री हनुमानजी के १० रहस्य

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



हिन्दुओं के प्रमुख देवता हनुमानजी के बारे में कई रहस्य जो अभी तक छिपे हुए हैं। शास्त्रों अनुसार हनुमानजी इस धरती पर एक कल्प तक सशरीर रहेंगे।

**१) हनुमानजी का जन्म स्थान**

कर्नाटक के कोपल जिले में स्थित हम्पी के निकट बसे हुए ग्राम अनेगुंदी को रामायणकालीन किष्किंधा मानते हैं। तुंगभद्रा नदी को पार करने पर अनेगुंदी जाते समय मार्ग में पंपा सरोवर आता है। यहां स्थित एक पर्वत में शबरी गुफा है जिसके निकट शबरी के गुरु मतंग ऋषि के नाम पर प्रसिद्ध 'मतंगवन' था। हम्पी में ऋष्यमूक के राम मंदिर के पास स्थित पहाड़ी आज भी मतंग पर्वत के नाम से जानी जाती है। कहते हैं कि मतंग ऋषि के आश्रम में ही हनुमानजी का जन्म हआ था। श्रीराम के जन्म के पूर्व हनुमानजी का जन्म हुआ था। प्रभु श्रीराम का जन्म ५११४ ईसा पूर्व अयोध्या में हुआ था। हनुमान का जन्म चैत्र मास की शुक्ल पूर्णिमा के दिन हुआ था।

**२) कल्प के अंत तक सशरीर रहेंगे हनुमानजी**

इंद्र से उन्हें इच्छा मृत्यु का वरदान मिला। श्रीराम के वरदान अनुसार कल्प का अंत होने पर उन्हें उनके सायुज्य की प्राप्ति होगी। सीता माता के वरदान अनुसार वे चिरजीवी रहेंगे। इसी वरदान के चलते द्वापर युग में हनुमानजी भीम और अर्जुन की परीक्षा लेते हैं। कलियुग में वे तुलसीदासजी को दर्शन देते हैं। ये वचन हनुमानजी ने ही तुलसीदासजी से कहे थे-

'चित्रकूट के घाट पै, भई संतन के भीर।
तुलसीदास चंदन घिसै, तिलक देत रघुबीर।।'

श्रीमद्भागवत अनुसार हनुमानजी कलियुग में गंधमादन पर्वत पर निवास करते हैं।

**३) कपि नामक वानर**

हनुमानजी का जन्म कपि नामक वानर जाति में हुआ था। रामायणादि ग्रंथों में हनुमानजी और उनके सजातीय बांधव सुग्रीव अंगदादि के नाम के साथ 'वानर, कपि, शाखामृग, प्लवंगम' आदि विशेषण प्रयुक्त किए गए। उनकी पुच्छ, लांगूल, बाल्धी और लाम से लंकादहन इसका प्रमाण है कि वे वानर थे। रामायण में वाल्मीकिजी ने जहां उन्हें विशिष्ट पंडित, राजनीति में धुरंधर और वीर-शिरोमणि प्रकट किया है, वहीं उनको लोमश ओर पुच्छधारी भी शतशः प्रमाणों में व्यक्त किया है। अतः सिद्ध होता है कि वे जाति से वानर थे।

**४) हनुमान परिवार**

हनुमानजी की माता का अंजनी पूर्वजन्म में पुंजिकस्थला नामक अप्सरा थीं। उनके पिता का नाम कपिराज केसरी था। ब्रह्मांडपुराण अनुसार हनुमानजी सबसे बड़े भाई हैं। उनके बाद मतिमान, श्रुतिमान, केतुमान, गतिमान, धृतिमान थे। कहते हैं कि जब वर्षों तक केसरी से अंजना को कोई पुत्र नहीं हुआ तो पवनदेव के आशिर्वाद से उन्हें पुत्र प्राप्त हुआ। इसीलिए हनुमानजी को पवनपुत्र भी कहते हैं। कुंति पुत्र भीम भी पवनपुत्र हैं। हनुमानजी रुद्रावतार हैं। पराशर संहिता अनुसार सूर्यदेव की शिक्षा देने की शर्त अनुसार हनुमानजी को सुवर्चला नामक स्त्री से विवाह करना पड़ा था।

**५) इन बाधाओं से बचाते हैं हनुमानजी**

रोग और शोक, भूत-पिशाच, शनि, राहु-केतु और अन्य ग्रह बाधा, कोर्ट-कचहरी-जेल बंधन, मारण-सम्मोहन-उच्चाटन, घटना-दुर्घटना से बचना, मंगल दोष, पितृदोष, कर्ज, संताप, बेरोजगारी, तनाव या चिंता, शत्रु बाधा, मायावी जाल आदि से हनुमानजी अपने भक्तों की रक्षा करते हैं।

**६) हनुमानजी के पराक्रम**

हनुमान सर्वशक्तिमान, सर्वज्ञ और सर्वत्र हैं। बचपन में उन्होंने सूर्य को निकल लिया था। एक ही छलांक में वे समुद्र लांघ गए थे। उन्होंने समुद्र में राक्षसी माया का वध किया। लंका में घुसते ही उन्होंने लंकिनी और अन्य राक्षसों के वध कर दिया। अशोक वाटिका को उजाड़कर अक्षय कुमार का वध कर दिया। जब उनकी पूछ में आग लगाई गई तो उन्हों लंका जला दी। उन्होंने सीता को अंगुठी दी, विभिषण को राम से मिलाया। हिमालय से एक पहाड़ उठाकर ले आए और लक्ष्मण के प्राणों की रक्षा की।

इस बीच उन्होंने कालनेमि राक्षस का वध कर दिया। पाताल लोक में जाकर राम-लक्ष्मण को छुड़ाया और अहिरावण का वध किया। उन्होंने सत्यभामा, गरूढ़, सुदर्शन, भीम और अर्जुन का घमंड चूर चूर कर दिया था।

हनुमानजी के ऐसे सैंकड़ों पराक्रम हैं।

**७) हनुमाजी पर लिखे गए ग्रंथ**

तुलसीदासजी ने हनुमान चालीसा, बजरंग बाण, हनुमान बहुक, हनुमान साठिका, संकटमोचन हनुमानाष्टक, आदि अनेक स्तोत्र लिखे। तुलसीदासजी के पहले भी कई संतों और साधुओं ने हनुमानजी की श्रद्धा में स्तुति लिखी है। इंद्रादि देवताओं के बाद हनुमानजी पर विभीषण ने हनुमान वडवानल स्तोत्र की रचना की। समर्थ रामदास द्वारा मारुती स्तोत्र रचा गया। आनंद रामायण में हनुमान स्तुति एवं उनके द्वादश नाम मिलते हैं। इसके अलावा कालांतर में उन पर हजारों वंदना, प्रार्थना, स्त्रोत, स्तुति, मंत्र, भजन लिखे गए हैं। गुरु गोरखनाथ ने उन पर साबर मंत्रों की रचना की है।

**८) माता जगदम्बा के सेवक हनुमानजी**

रामभक्त हनुमानजी माता जगदम्बा के सेवक भी हैं। हनुमानजी माता के आगे-आगे चलते हैं और भैरवजी पीछे-पीछे। माता के देशभर में जितने भी मंदिर है वहां उनके आसपास हनुमानजी और भैरव के मंदिर जरूर होते हैं। हनुमानजी की खड़ी मुद्रा में और भैरवजी की मुंड मुद्रा में प्रतिमा होती है। कुछ लोग उनकी यह कहानी माता वैष्णोदेवी से जोड़कर देखते हैं।

**९) सर्वशक्तिमान हनुमानजी**

हनुमानजी के पास कई वरदानी शक्तियां थीं लेकिन फिर भी वे बगैर वरदानी शक्तियों के भी शक्तिशाली थे। ब्रह्मदेव ने हनुमानजी को तीन वरदान दिए थे, जिनमें उन पर ब्रह्मास्त्र बेअसर होना भी शामिल था, जो अशोकवाटिका में काम आया। सभी देवताओं के पास अपनी अपनी शक्तियां हैं। जैसे विष्णु के पास लक्ष्मी, महेश के पास पार्वती और ब्रह्मा के पास सरस्वती। हनुमानजी के पास खुद की शक्ति है। इस ब्रह्मांड में ईश्वर के बाद यदि कोई एक शक्ति है तो वह है हनुमानजी। महावीर विक्रम बजरंगबली के समक्ष किसी भी प्रकार की मायावी शक्ति ठहर नहीं सकती।

**१०)** इन्होंने देखा हनुमानजी को १३ वीं शताब्दी में माध्वाचार्य, १६ वीं शताब्दी में तुलसीदास, १७ वीं शताब्दी में रामदास, राघवेन्द्र स्वामी और २० वीं शताब्दी में स्वामी रामदास हनुमान को देखने का दावा करते हैं। हनुमानजी त्रेता में श्रीराम, द्वापर में श्रीकृष्ण और अर्जुन और कलिकाल में रामभक्तों की सहायता करते हैं

## नंदी हा केवळ एक प्राणी?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कर्नाटकातील शिवमोगा जिल्ह्यात वसलेले इकेरी हे ठिकाण विजयनगर साम्राज्यानंतर उदयाला आलेल्या केळदी नायकांच्या (इकेरी नायक) वैभवाची साक्ष देते. येथील अघोरेश्वर मंदिर हे भारतीय वास्तुकलेचा एक असा चमत्कार आहे, जो पाहिल्यानंतर मानवी कौशल्यासमोर नतमस्तक व्हायला होते. या मंदिराचा इतिहास, स्थापत्य आणि विशेषतः त्यातील नंदीच्या मूर्तीबद्दल थोडीशी माहिती.

### इकेरी नायकांचा इतिहास आणि मंदिराची निर्मिती

विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर सोळाव्या शतकात केळदीच्या नायकांनी आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. 'इकेरी' ही त्यांची १५६० ते १६४० या काळात राजधानी होती. अघोरेश्वर मंदिर हे या राजवंशातील राजा चौडप्पा नायक याने बांधायला सुरूवात केली आणि नंतरच्या राजांनी ते पूर्णत्वास नेले. या मंदिराची अधिष्ठित देवता भगवान शिवशंकर अघोरेश्वर रूपात विराजमान आहेत.

### स्थापत्यशास्त्रात वेगवेगळ्या शैलींचा संगम

अघोरेश्वर मंदिराचे स्थापत्य हे होयसळ, चोल आणि विजयनगर शैलींचे एक अद्भुत मिश्रण आहे. हे मंदिर प्रामुख्याने ग्रॅनाईट आणि हिरवट पाषाणात बांधलेले आहे. मंदिराचा गर्भगृह, अंतराळ आणि एक विशाल मुखमंडप अशा भागांत विभागणी झाली आहे. मंदिराच्या भिंतींवर हत्ती, घोडे आणि पौराणिक कथांचे अतिशय बारीक कोरीव काम पाहायला मिळते.

**मग येथे जाऊन पाहाच..!**

### अघोरेश्वर मंदिराचा नंदी- दगडातील जीवंत चमत्कार

या संपूर्ण मंदिराचा सर्वांत मोठा आकर्षण बिंदू म्हणजे येथील विशाल नंदी. हा नंदी ज्या मंडपात बसवलेला आहे त्याला नंदी मंडप म्हणतात. मी २०१० साली येथे प्रथम आलो तेव्हा येथील नंदीबद्दलच्या काही खास गोष्टी नोटीस केल्या.

### दगडाचा प्रकार आणि पोत

हा नंदी एकाच अखंड पाषाणातून कोरलेला आहे. हा दगड कृष्णशीला किंवा एका विशिष्ट प्रकारच्या मऊ पण टिकाऊ पाषाणातून बनलेला असावा. ज्यावर कोरीव काम करणे सोपे असते पण कालांतराने तो काचेसारखा कडक होतो.

### गुळगुळीतपणा आणि चकाकी

तुम्ही जेव्हा या नंदीला स्पर्श करता तेव्हा तो दगडाचा न वाटता एखाद्या काचेचा किंवा धातूचा असल्याचा भास होतो. हा नंदी इतका गुळगुळीत आहे की त्यात तुमचे प्रतिबिंब स्पष्ट दिसू शकते. पाचशे वर्षांपूर्वी कोणत्याही आधुनिक मशीनशिवाय हा दगड इतका गुळगुळीत कसा केला असेल, हे आजही संशोधकांसाठी कुतूहल आहे. जुन्या काळात नैसर्गिक तेले, लाख आणि बारीक वाळूचा वापर करून कित्येक महिने घासून ही चकाकी आणली जात असे.







### उत्कृष्ट कलाकृती आणि कोरीव काम

नंदीच्या गळ्यात असलेल्या घंटा, साखळ्या आणि पाठीवरची झूल यांचे कोरीव काम इतके सुबक आहे, की त्यातील साखळीचे दुवे खरोखरचे हलतील असे वाटते.

### नेत्रदीपक जीवंतपणा

नंदीचे डोळे, कान आणि त्याचे बसण्याचे बाळसे इतके जीवंत वाटते, की जणू काही हा नंदी आता श्वास घेईल आणि उठून उभा राहील.

### रचनात्मक वैशिष्ट्य

नंदीची नजर सरळ गर्भगृहातील शिवलिंगाकडे खिळलेली आहे जी प्रत्येक भक्ताला एकाग्रतेचा संदेश देते.

### मनात विचार येतो हे इतके सुंदर कसे कोरले असेल?

त्या काळातील शिल्पकारांना 'दगडाची नाडी' माहीत होती. ते दगड कापण्यासाठी पाणी आणि लाकडी पाचर यांचा वापर करत. एकदा का आकार मिळाला, की अतिशय बारीक छिन्नी आणि हातोड्याने नक्षीकाम केले जाई. सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे 'पॉलिशिंग'. यासाठी स्थानिक वनस्पतींचे रस आणि विविध प्रकारच्या दगडांच्या चुन्याचा वापर करून हाताने घासून ही काचेसारखी चकाकी आणली जात असे.

इकेरीचे अघोरेश्वर मंदिर आणि त्यातील तो तेजस्वी नंदी हा केवळ दगड नाही, तर तो आपल्या पूर्वजांच्या बुद्धिमत्तेचा आणि कलेप्रती असलेल्या निष्ठेचा पुरावा आहे. जर तुम्हाला स्थापत्यशास्त्राची आवड असेल, तर कर्नाटकातील हा 'दगडातील हिरा' पाहणे ही एक पर्वणीच ठरेल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)